महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २६१ वा | दिनांक : १३/०८/२०२५ | वार : बुधवार

## मनोज जरांगेंचा मुंबईत दंगल घडवण्याचा डाव : ओबीसी नेते लक्ष्मण हाके



**बीड** : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा मुंबईत जाळपोळ व दंगल घडवण्याचा कट आहे. त्यामुळेच ते ऐण सनावारांच्या दिवसांत मुंबईला जात आहेत, असा दावा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मंगळवारी केला. या प्रकरणी त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जरांगेंना आंतरवाली सराटीतच रोखण्याचे आवाहनही केले आहे.

मनोज जरांगे येत्या २९ ऑगस्टपासून मुंबईत मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणार आहेत. ते आपल्या समर्थकांसह आझाद मैदानावर उपोषणाला बसणार आहेत. सध्या ते पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर जाऊन याविषयी वातावरण निर्मिती करत आहेत. त्यांच्या या आंदोलनाची तारीख जसजशी जवळ येत आहेत, तसतसे राज्याचे राजकारण तापत आहे. या पार्श्वभूमीवर लक्ष्मण हाके यांनी त्यांच्यावर निशाणा साधला आहे.

लक्ष्मण हाके मंगळवारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले की, मनोज जरांगे यांनी बीड शहर जाळले. त्यांना त्याच गोष्टी मुंबईत जाऊन करायच्या आहेत. यासाठीच त्यांनी गणेशोत्सवाची तारीख निवडली. मुंबईला जायचे आणि दंगल घडवून आणायची हाच एकमेव कार्यक्रम त्यांचा आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माझी विनंती आहे की, त्यांनी जरांगे यांचा सणासुदीच्या वातावरणात जाळपोळ करण्याचा डाव रोखावा. त्यांना आंतरवाली सराटीतच उपोषण करण्याची परवानगी द्यावी.

मनोज जरांगे यांची बाषा प्रक्षोभक व चिथावणीखोर आहे. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना तुरुंगात डांबावे. त्यांची मागणी अवैध आहे. त्यानंतरही सरकार त्यांचे लाड का करत आहे? जरांगे यांनी थोडासा अभ्यास करून हिंदी विषयाचे अवलोकन करावे, असे ते म्हणाले.

लक्ष्मण हाके यांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावरही निशाणा साधला. शरद पवार व मनोज जरांगे यांचा एकमेवर कार्यक्रम हा राज्यातील वातावरण बिघडवण्याचा आहे. जरांगेंच्या झुंडशाहीला बळी पडून प्रशासनाने एखादा वेगळा निर्णय घेतला तर ओबीसी समाज त्याला जोरदार प्रत्युत्तर देईल. शरद पवार हे मंडल आयोगाचे जनक आहेत ही शुद्ध भामटेगिरी आहे. ओबीसींना वेड्यात व मूर्खात काढण्याचा प्रयत्न शरद पवार करत आहेत, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे मनोज जरांगे यांनी नुकताच देवेंद्र फडणवीसांवर निशाणा साधताना ते एकनाथ शिंदेंसह सरकारमधील सर्वच नेत्यांना संपवत असल्याचा आरोप केला होता. एवढेच नाही तर भविष्यात मराठा विरुद्ध ओबीसी अशी एखादी दंगल झाली तर त्याला फडणवीसच जबाबदार असतील असा आरोपही त्यांनी केला होता.

## सरकारने दिलेला शब्द पाळावा, अन्यथा शेतकऱ्यांचा चाबूक मंत्र्यांच्या पाठीवर पडेल - रविकांत तुपकर



**हिंगोली** : राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याचे आश्वासन सरकारने निवडणुकीपूर्वी दिले होते. सरकारने दिलेला शब्द पाळावा अन्यथा शेतकऱ्यांचा चाबूक मंत्र्यांच्या पाठीवर पडेल, असा इशारा क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी मंगळवारी ता. 12 हिंगोलीत दिला.

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, घरकुलाचे अनुदान सुरळीत द्यावे, विहिरी व गोठ्यांचे अनुदान तातडीने द्यावे यासह इतर मागण्यांसाठी तुपकर यांच्या नेतृत्वाखाली हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे, नामदेव पतंगे, धनगर समाजाचे नेते वैजनाथ पावडे, गजानन जाधव, प्रविण मते, संजय मुळे, सखाराम भाकरे, विनोद जाधव, आदित्य टेकाळे, मुनीर पठाण यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते. हिंगोली येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या पासून निघालेला मोर्चा शहरातील प्रमुख मार्गावरून जिल्हाधिकारी कार्यालयावर आल्यानंतर उपस्थित प्रमुखांनी मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना तुपकर म्हणाले की, सरकारने निवडणुकीपूर्वी संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र अद्यापही शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी दिलेली नाही. त्यामुळे राज्यभरातील लाखो शेतकरी कर्जमाफीच्या अपेक्षेने सरकारच्या निर्णयाकडे डोळे लाऊन बसले आहे. मात्र हे सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप त्यांनी केला.

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी सोयाबीनला भाव नसल्यामुळे आर्थिक अडचणीत सापडला आहे. एकीकडे शेतकरी आर्थिक अडचणीत असतांना दुसरीकडे शासनाने तेलाची आयात सुरु केली आहे. शासनाने तेलाची आयात थांबवावी तसेच डीओसी पावडरची निर्यात सुरु करावी अशी मागणी त्यांनी केली. या शिवाय मेंढपाळांना चराईक्षेत्रात मेंढ्या चारण्याची मुभा देण्याची मागणीही त्यांनी केली.

राज्य शासनाने शेतकऱ्यांना गृहीत धरू नये. हिंगोलीचा मोर्चा हा ट्रेलर असून पिक्चर अजून बाकी आहे. त्यामुळे सरकारने कर्जमाफी करावी अन्यथा शेतकरी मंत्र्यांना रस्त्यावर चोप देतील असा इशारा त्यांनी दिला. यापुढील आंदोलन आणखी तिव्र असणार असून त्या आंदोलनाच्या नियोजनासाठी लवकरच बैठक घेतली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## १५ ऑगस्ट रोजी मांसाहारावर बंदी - अजित पवारांचा संताप



**पुणे** : स्वातंत्र्य दिनानिमित्त कल्याण-डोंबिवली पालिका क्षेत्रातील सर्व लहान आणि मोठ्या जनावरांचे कत्तलखाने बंद ठेवण्यात येणार आहेत, असे आदेश कल्याण-डोंबिवली महापालिकेकडून जारी करण्यात आले. तसेच छत्रपती संभाजीनगर, मालेगाव, नागपूर या महापालिकांनी सुद्धा हा आदेश दिला आहे. त्यानुसार १५ ऑगस्टला रात्री १२ पासून १५ ऑगस्ट रात्री १२ वाजेपर्यंत पर्यंत प्राण्यांची कत्तल करू नये, असे आदेश महापालिकेने दिले आहेत. जनावरांची कत्तल आणि मांसविक्री केल्यास कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा देण्यात आला होता. यावर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे.

पत्रकारांशी बोलताना अजित पवार म्हणाले, ज्यावेळेस श्रद्धेचा प्रश्न असतो त्यावेळेस अशा प्रकारची बंदी घातली जाते. आषाढी असेल, महाशिवरात्री असेल, महावीर जयंती असेल, अशा काही महत्त्वाच्या दिवस असतात त्यावेळेस बंदी घातली जाते. आता देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्ष होत आहेत. आपल्या देशात, राज्यात काही जण शाकाहारी आहेत तर काही मांसाहारी आहेत. आता तुम्ही कोकणात जर गेलात तर साधी भाजी करताना पण तिथे सुकट, बोंबील असलं काही त्यात घालतात. कारण, तो त्यांचा आहार आहे. त्यांचा आहार त्यांना घ्यायला बंदी घालणे हे बरोबर नाही, उचित नाही.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, महत्त्वाच्या शहरांमध्ये अनेक जाती-धर्माचे लोक राहतात. भावनिक मुद्दा असेल तर एकवेळ त्या दिवसपुर्ते किंवा काही दिवसांसाठी बंदी असेल तर लोक स्वीकारतात. परंतु, तुम्ही आता महाराष्ट्र दिनाला, २६ जानेवारीला किंवा १५ ऑगस्टला अशी जर बंदी घालायला लागलात तर उलट अवघडच आहे. ग्रामीण भागामध्ये तर ज्यावेळेस एखादा कार्यक्रम असतो तेव्हा बकरा कापतात आणि साजरा करतात. लोकांच्या भावना देखील महत्त्वाच्या आहेत. परंतु, भावनेचा आणि श्रद्धेचा विषय जेव्हा येईल त्यावेळेस त्या विषयाकडे त्या दृष्टीने बघावे. आदिवासी समाजामध्ये तुम्ही जर बघितले तर त्यांचा मोठ्या प्रमाणातला आहार हा मांसाहारच असतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साखर कारखान्यांना जीवनदान दिले, पण अभिनंदनाच्या बॅनरवर त्यांचा फोटो नाही. यावरून राधाकृष्ण विखे पाटलांनी जनाची नाही तर मनाची तरी लाज ठेवावी अशी टीका केली होती. यावर अजित पवारांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले, राधाकृष्ण विखे पाटलांचा काही तरी गैरसमज झाला आहे. मी एका कारखान्याचा चेअरमन आहे. तिथे मला एकाने सांगितले की २२ तारखेला तुमचा आणि मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस आहे तर कारखान्याच्या तर्फे आपल्याला जाहिरातबाजी करायची, त्यावर मी म्हटले की अजिबात जाहिरातबाजी करायची नाही. ज्यांना कोणाला करायची असेल ते स्वखर्चाने करतील. आपण कारखान्यात शेतकऱ्यांना चांगला भाव, कामगारांना योग्य पद्धतीने मानधन देण्यासाठी आपण बांधील आहोत असे सांगितले आहे.

मी राधाकृष्ण विखे पाटलांशी यावर बोलेल. मी कशाला असे करू? मी स्वतः स्वीकारतो न की इथेनॉलला पेट्रोलमध्ये काही प्रमाणात मिक्स करण्याचे बंधन हे केंद्र सरकारने आणल्यामुळे कारखानदारीला मदत झाली आहे. याचे श्रेय देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री व सहकार मंत्री अमित शहा यांनाच जाते.

रायगड पालकमंत्री पदावर भरत गोगावले नाराज असल्याचे बोलले जात असल्याचे म्हटले जात आहे. यावर प्रश्न विचारला असता अजित पवार म्हणाले, कोणाला जिल्ह्याचे पालकमंत्री करायचे, कोणाला कोणती मंत्रिपद द्यायची, कोणाला मंत्रिमंडळात घ्यायचे याचा अधिकार घटनेने मुख्यमंत्र्यांना दिलेला आहे. वेळोवेळी राज्याच्या प्रमुखांनी सांगितले आहे की त्या दोन ठिकाणी कोणाला पालकमंत्री करायचे याचा निर्णय आम्ही घेऊ. तसेच पालकमंत्री नाही म्हणून तिथले काम अडले जाणार नाहीत.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १३ ऑगस्ट २०२५

## संगीत आणि गीत मानवी मनाचे अविभाज्य घटक : कवी प्रा. वा. ना. आंधळे




**धरणगाव :** संगीताचा जन्म झाला नसता तर गितंही जन्माला आली नसती.या दोन्ही गोष्टी जन्माला आल्या नसत्या तर मानवी जीवन आणि मानवी मन यांना रुक्षता आली असती.मानवी आयुष्य सकारात्मकतेला मुकलं असतं. असे सांगत संगीताची व गीताची शक्तीस्थाने सुप्रसिद्ध कवी प्रा.वा. ना.आंधळे यांनी सप्रमाण कथन केली.काल दि.१०.ऑगस्ट२५रोजी श्री. आदिनाथ दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट व स्व.लक्ष्मीकांतजी डेडिया सर शिष्य परिवार आयोजित ,स्व.मास्टरजी लक्ष्मीकांतजी डेडिया स्मृती स्वरांजली तृतीय संगीत महोत्सवाचे उदघाटन प्रसंगी उदघाटक म्हणून बोलत होते.

आपल्या मनोगतात ते पुढे म्हणाले की,वर्तमान काळ हा धकाधकीचा व मोठा स्पर्धेचा असल्यामुळे मनाला सक्षमता आणि सामर्थ्य मिळावे यासाठी संगीत आवश्यक आहे.अनेक आजार त्यातल्या त्यात मानसिक आजारावर संगीत हा यथोचित उपाय आहे.असे सांगत लय, ताल,आरोह अवरोह,नजाकत, यावर भाष्य करीत काही संगीत रागांच्या उदाहरणासह दोन गीतांच्या सादरीकरणातुन मानवी मनावर होणाऱ्या संस्काराकडे श्रोत्यांचे लक्ष वेधले. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.अजित डहाळे,प्रतिष्ठित व्यापारी कांतीलाल शेठ डेडिया, प.रा. हायस्कूल सोसायटीचे सचिव डॉ.मिलिंद डहाळे,एल आय सी चे डेव्हलपमेंट ऑफिसर श्री.रावतोळे यांची उपस्थिती होती. सदर संगीत महोत्सवात व्हायोलिन वादक भूषण चौधरी (हरिद्वार),बासरी वादक योगेश पाटील (एरंडोल),यांनी सोलो आणि समूह वादनाने समारंभाची सुरुवात झाली. सचिन भावसार, सौ.स्वाती भावे, देवा महाजन, सुधीर भावसार,संजय परदेशी,कु.उत्कर्षा भरत चौधरी, राजेश डहाळे, तनय डहाळे, नाना पवार, अहान डहाळे, कु.श्रेया भावे, प्रा.बी. एन.चौधरी, प्रदीप झुंजारराव यांच्या गीत गायनाने चांगलीच रंगत आणली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल जैन यांनी केले.सूत्र संचलन प्रा.ए. आर.पाटील यांनी केले तर आभार प्रतिक जैन यांनी केले.

## "एक पेड माँ के नाम" अंतर्गत संकल्पनेस अंजना स्कूल ऑफ एक्सीलंस शाळेचा सहभागग



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) :** "एक पेड माँ के नाम" पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राबवलेली संकल्पना पूर्ण देशामध्ये पसरत असून विविध क्षेत्रातील नागरिक देखील यामध्ये सहभागी होत असून आपला पाठिंबा दर्शवत आहे. छ. संभाजी नगर, गंगापूर - खुलताबाद विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदार श्री. प्रशांत बंब साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली म्हैसमाळ येथे १११११/— झाडे लावण्यात आली व त्यामधील प्रत्येक झाडाची काळजी घेण्यात येईल असे वनविभागाने आश्वासन दिले. विद्यमान आमदार साहेबाच्या पुढाकाराने एवढा मोठा सामाजिक उपक्रम पार पाडण्यात आला, याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. "झाडे लावा झाडे जगवा" असे प्रत्येक विद्यार्थ्यांना ते सांगत होते. परिसरातील बहुतेक शाळा यामध्ये सहभागी झाल्या होत्या. अंजना स्कूल ऑफ एक्सीलंस अशा सरकारी कार्यक्रमध्ये नेहमीच आपला सहभाग नोंदवत असते.अंजना स्कूल देखील प्रत्येक वर्षी १००० झाडे विविध परिसरात लावत असतात. परंतु या सामाजिक उपक्रमामुळे शाळेचा आत्मविश्वास अजुन वाढला असून , वर्षानुवर्षे झाडे लावण्याचे काम करत राहू, असा निश्चय शाळा व्यवस्थापनाने केला आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## सिद्धार्थ महाविद्यालय पडेगाव येथे ग्रंथपाल दिवस उत्साहात साजरा





**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) :** आज दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजीभारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीच्या निमित्ताने साजरा केला जाणारा राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर वानखडे हे अध्यक्षस्थानी होते तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शीलवंत गोपनारायण यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वानखडे यांनी आपल्या मनोगतामध्ये म्हटले की, ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. सियाली रामामृत रंगनाथन यांनी गणितज्ञ व गणित विषयात वरिष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत असताना सुद्धा ग्रंथालय या विषयाला योग्य न्याय मिळाला पाहिजे यासाठी आपले पद सोडून देऊन ग्रंथालय जगतात नवीन दिशा, कायदे, सुव्यवस्था निर्माण व्हावी, ग्रंथालयामध्ये पुस्तकांची देवाण-घेवाण करण्यासाठी वर्गीकरण व तालिकीकरण व्यवस्था निर्माण करण्यासाठी पूर्ण वेळ देऊन ग्रंथालयाचे कामकाज सोपे करण्यासाठी कार्य केले, त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने त्यांना पद्मश्री या पुरस्काराने सन्मानित केले आणि त्यांना डॉक्टररेट ही पदवी बहाल करण्यात आली.अशा या महान ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विभूतीस त्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. पुढे ते म्हणाले ग्रंथालय या विषयाकडे संपूर्ण राज्याचेच नव्हे तर देशाच्या शासन व प्रशासनाचे पुरेसे लक्ष नसल्याचे सुद्धा प्राचार्य डॉ. मनोहर वानखडे म्हणाले. ग्रंथपाल सहाय्यक ग्रंथपाल आणि ग्रंथालय सेवक यांच्याकरिता राज्य शासनाने योग्य ते वेतन श्रेणी देऊन त्यांना आर्थिक पाठबळ देणे महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे सार्वजनिक ग्रंथालयांना व वाचनालयांना शासनाने अनुदान देणे तितकेच महत्त्वाचे आहे.यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिलवंत गोपनारायण, डॉ. सुकेशनी जाधव, ग्रंथपाल प्रा .सुनील बत्तिसे, प्रा. असित शेगावकर, प्रा. दीपक पाईकराव, अनिता काकरवाल , मोईन तडवी, रोहिणी देवकते, प्रा.रेणुका चव्हाण, कोमल गायकवाड, परमेश्वर रत्नपारखे, श्रीकांत पातोडे, विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १३ ऑगस्ट २०२५

# विकृतीवर घणाघात करणारी आशयघन कविता: ‘अस्वस्थ’




अस्वस्थ’ हा कवी कैलास भाले यांचा दुसरा दमदार कविता संग्रह आहे. त्यांनी अफाट दुःखाचा कटू अनुभव घेऊन त्याचा सत्त्वसार आपल्या कवितांमधून मांडला आहे. “माझ्याकडे सुखाने कायमची पाठ फिरवली!” असं मनोगतात म्हणणारा हा मूल्यधर्मी कवी, वंचित, उपेक्षित, दुर्लक्षितांचं दुःख आपल्या कवितेच्या कवेत घेऊन त्यावर फुंकर घालतो ही बाब स्तुत्य आहे।या कवीने अस्वस्थ होत अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. जेव्हा सर्जनोत्सुक मन अस्वस्थ असतं, तेव्हाच दमदार कविता साकारत असते. लेखणी झुंजार बनत असते. “झुंजार लेखणीला हरणे, कबूल नाही झुंजार लेखलीला झुरणे कबूल नाही !” .....सूर्यकुलं पृष्ठ. 70कैलास भाले झुंजार लेखणीचे धनी आहेत. त्यांनी आधी सगळ्यांचं भलं करून, मग आमचंही भलं कर असं म्हणणाऱ्या आपल्या विशाल मनाच्या आईचं कसदार, सत्त्वशील दूध पचवलं आहे. श्रमधर्मी बापाचे कष्ट त्यांना आठवत राहतात. कैलास भाले आपल्या कवितेतून मोठा आशय मार्मिकर्तने वाचकांसमोर ठेवतात. ‘पहाट’ कवितेत ते म्हणतात -“तुला पाहून माझ्यातनरत्वआणि मला पाहून तुझ्यातमादीत्त्व जागं होतंतर मग चल नाजातीभेदाची पहाट होण्याआधीच्यात्या अंधारात.”कवितेवर प्रतेक कवी कविता लिहितोच लिहितो. कविता-“ममतेचा पंखगर्जनेचा शंखबंडाचा डंख असते ।”.....ठिणगी पृष्ठ. 3हे ठाऊक असल्याने कैलास भाले वेगळ्या धाटणीची, घुसमट अक्षरबद्ध करणारी ‘कवी’ नावाची कविता लिहितो.कैलास भाले नावाचा चिंतनशील कवी आपल्या शैलीत व्यक्त होतो. तो म्हणतो -“विस्तारित शहराच्या वळणासाठीरेखांकित भूसंपादनात,मांगवाडा उध्वस्त होईलपण कुत्र्यासाठी हातातल्याकाठीची, संगिणी होवोदुःख ओले झेलतानामोडलेला माणूस उभा राहो.”अशी अभिलाषा वंदनीय आहे.‘चळवळ’ या कवितेत हा निर्भीड कवी मुखवटा लाऊन विद्रोही भाषण करून मोर्चेकऱ्यांना भडकवणाऱ्या नेत्याला अनावृत्त करत त्याचा मुखवटा टराटरा फाडून टाकतो! पोतराजला समज देत अंधश्रध्देला सुरंग लावतो: ‘वाघ’ ‘माती’ या विचार कविताही चिंतनीय आहेत. ‘उकल’ या आशयघन कवितेत कवी म्हणतो -“तुझी भूतदया अशी कीगाईला चारा टाकून तूठेवलं पाखरांना पाणीकुत्र्याला भाकर टाकूनमुग्यांना साखर ठेवलीपण मग दलितांची घरं गावाबाहेर कशी?”अद्भुत भूतदयेचं भूत उतारत कवीचा हा प्रश्न खूप गहन आहे.भाव’ कवितेत अडते, दलालांना अनावृत्त करत ‘काटा आपला आणि तोल त्यांचा’ म्हणत अन्नदात्याची तरफदारी भक्कमपणे करतो. काळया रुळाला ठोकरून स्वातंत्र्य, समता, बंधुतेसह न्यायाचा जयघोष बुलंद करणारा हा जिंदादिल कवी आहे ! भेसळखोरांच्या उरात धडकी भरवण्याचं काम शस्त्र असलेली विद्रोही कविताच करू शकते; हे पटऊन देणारा हा डंखबाज कवी आहे !! या आशयघन सत्त्वशील कवितेने विद्रोही कवितेच्या समृद्ध दालनात मोलाची भर घातली आहे.अंगारा, धुपारा यावर विश्वास न ठेवता हे युग “मंत्र-तंत्र खोटे, महा खोटा जादूटोणाविज्ञानाच्या सोटयाने खोटे सारे हाणा”....रणांगण पृष्ठ 38असा मंत्रघोष करण्याचे विज्ञानयुग आहे. याचे या कवीला ज्ञान आणि भान आहे. पर्यावरण वाचवणे हे भूमीसाठी फायद्याचेच आहे अशी या चिंतनशील कवीची भूमिका आहे. आडदांड अंधारात उजेडाने तग धरावा म्हणून आपणच दान आणि दातृत्वाचे धनी बनले पाहिजे असं आवाहन कवीने केलंय. झेंडा, अण्णा, धाव या मर्मभेदक वास्तवतेच्या वेध घेणाऱ्या दमदार कविता आहेत.‘परिवर्तन’ या कवितेत कवीने फार मोठा संदेश दिला आहे.”ठेविले अनंते तैसेची राहावेचित्ती असू द्यावे समाधानया तत्वज्ञानाने बेचैन झालो तेव्हाअंधारात जन्मलो तरी,अंधारात मरणार नाही म्हणूनमूळ गाभ्यालाच हात घालूनअनुत्तरित प्रश्नांच्या शोधातसोडली पायरी,तर सुख-शांती-समाधानाचा प्रकाशउत्तर बनून मलाच धुंडाळीत आला !”ही कवितेवर अफाट प्रेम करणाऱ्या धेयधुंद कवीची अग्निधर्मी डंखबाज कविता आहे. कटी-मिठी, आलिंगन-चुंबनावर कविता करणाऱ्या, गुलछबू कवींना ती पचणार नाही. थोर विचारवंत आ. ह. साळुंखे यांची पाठराखण हा या अग्नीची लाली मिरवणाऱ्या कवीला मिळालेला मोठा पुरस्कार आहे. विद्रोहाची, समतेची शंख गर्जना करणाऱ्या या कवीला भरभरून शुभेच्छा !

**डी. बी. जगत्पुरिया,**
‘संगर’ पाण्याच्या टाकी मागे, मीरानगर,
पडेगांव, संभाजीनगर- 431002
मो. 9860485398

# शिवाजी महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र अभ्यासक्रमावरील चार पुस्तकांचे प्रकाशन



**कन्नड (प्रकाश खेत्री) :** शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागात बी.एस्सी. द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमावर आधारित चार पुस्तकांचे प्रकाशन प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या हस्ते आज करण्यात आले.नवीन शैक्षणिक धोरणाचा विचार करून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम सुलभ व समजण्यास सोपा व्हावा, या उद्देशाने सेमिस्टरनिहाय ही पुस्तके तयार करण्यात आली आहेत. यामध्ये अपुष्प वनस्पतीतील विविधता (Diversity of Cryptogams), वनस्पतींचे पर्यावरण शास्त्र (Plant Ecology), अनावृत्त बीज वनस्पती व पुरावनस्पतीशास्त्र (Gymnosperms & Palaeobotany) आणि वनस्पती शरीर विज्ञान (Plant Physiology) या विषयांचा समावेश आहे.ही पुस्तके एज्युकेशनल पब्लिकेशन, छत्रपती संभाजीनगर मार्फत प्रकाशित झाली असून, त्यामागे वनस्पतीशास्त्र विभागाचे डॉ. अनिल क्षिरसागर, डॉ. संजय पवार आणि प्रा. निर्मला पाटील यांचा मोलाचा सहभाग आहे. प्रकाशन सोहळ्याला उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, डॉ. एस. एम. पवार, डॉ. सचिन उपाध्ये व डॉ. प्रकाश खेत्री उपस्थित होते.

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १३ ऑगस्ट २०२५


## रोटरी क्लबच्या वतीने पालीवरील महिलांसाठी साडीचोळीचे वाटप



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** दि ११ ऑगस्ट २०२५ रोजी रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने आणि रोटरी क्लब मुरूम सिटीचे सदस्य शिवशरण वरनाळे यांच्या वाढदिसानिमित्त गणेश नगर मुरूम येथील पालीमध्ये राहणाऱ्या महिलांना टॉवेलटोपी साडीचोळी भेट म्हणून देण्यात आले.आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो आणि गोरगरिबांना मदत करणे हेच रोटरीचे मोलाचे कार्य आहे त्यामुळे माझ्या वाढदिवसानिमित्ताने आपण महिलांसाठी टॉवेलटोपी साडीचोळीचे वाटप करत आहात हे मोठे अभिमानास्पद बाब आहे असे प्रतिपादन शिवशरण वरणाळे यांनी केले.या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष अप्पासाहेब सूर्यवंशी ,सचिव कल्लप्पा पाटील हे उपस्थित होते.शिवशरणमामा वरनाळे यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांचा सत्कार शरणप्पा धुम्मा यांनी केला.रोटरी क्लबच्या माध्यमातून शिवशरण वरनाळे यांनी अनेक समाज उपयोगी काम केलेले आहेत असे प्रकाश रोडगे म्हणाले.कार्यक्रमाची सुरेख असे संचलन संतोष कांबळे यांनी केले आणि आभार सचिव कलप्पा पाटील यांनी मानले.या कार्यक्रमासाठी सुनील राठोड,भूषण पाताळे, प्रा. राजेंद्र वाकडे, प्रा. कलय्या स्वामी, बाबासाहेब पाटील, अमृत वरनाळे, बसवेश्वर नागरी पतसंस्थेचे कर्मचारी , पालीवरील अनेक महिला व पुरुष मंडळी उपस्थित होते.

## पुरातत्व विभागाच्या वतीने दौलताबाद येथे भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली



**दौलताबाद (जावेद अहमद) :** स्वतंत्र दिन शुक्रवारी साजरे होणार आहे त्यानुषणगाने विविध शासकीय निमशासकीय आस्थापने यांच्या वतीने विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेहर घर तिरंगा या अंतर्गत चांदमीनार वर आकर्षक तिरंगा लाइट लावण्यात आले आज दौलताबाद बस स्टँड ते दौलताबाद देवगिरी किल्ल्यावर तिरंगा रॅली काढण्यात आली या रॅली मध्ये माऊंट वैली प्री प्रायमरी वसावित्रीबाई फुले इंग्लिश स्कूल रांजणगाव शेनपुंजी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलाविद्यार्थ्यांनी आकर्षक लेझीम सादर केलेभारत माता की जय,वंदे मातरम, घोषणा देत रॅली काढण्यात आलीपुरातत्व विभागाच्या वतीने मंडळ मध्ये विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले त्यात रांगोळी ,सेल्फी तिरंगा,छायाचित्रे प्रदर्शनी यावेळी पुरातत्व विभागाचे नंदकिशोर विजुपुरीया, संजय रोहनकर संरक्षक सहायक,सुभाष पंडीत, मुख्याध्यापक कुमार झोडपे,कल्याणी भास्कर, किरण भालेराव, आकाश पिंपळे,रवींद्र घाटे,एस एस नीळ,गोरख बनकर,सीताराम धनाईत,आसाराम काळे,फकिरचंद गायकवाड, सोमनाथ आढाव,बाबासाहेब आढाव,राजू कीर्तिकर, मधुकर राठोड,शांतीलाल राठोड,संजय घुसळे,विध्यानद मोहोट,प्रियंका कोकाटे, वृषाली गायकवाड, भाग्यशाली फुलझेले, जुबेदा शेख, , सोनाली मिसाळ,कविता वाघमारे, मणिषा टिपराळे , महेश राठोड, सुमित मुळे,आकाश सोनवणे, सुप्रिया म्हस्के,, पुजा मौर्या, प्रिया महोत्तो, मंगल बडे,शेख गौसिया कर्मचारी रुपाली मोगरेआदींची उपस्थिती होती


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903


## माधवराव पाटील महाविद्यालयात डॉ. रंगनाथन यांची जयंती साजरी



मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात डॉ. रंगनाथन यांची जयंती साजरी करताना अशोक सपाटे, चंद्रकांत बिराजदार व अन्य

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथालयशास्त्राचे प्रणेते पदमश्री डॉ. रंगनाथन यांची ११३ वी जयंती मंगळवारी (ता. १२) रोजी साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रतापसिंग राजपूत, प्रा. अशोक बावगे, ग्रंथपाल डॉ. राजकुमार देवशेट्टे, डॉ. राम बजगिरे, डॉ. रवी आळंगे, डॉ. सायबण्णा घोडके, प्रा. गोपाळ कुलकर्णी, डॉ. अविनाश मुळे, डॉ. प्रकाश कुलकर्णी, प्रा. दिनकर बिराजदार, डॉ. सुधीर पंचगल्ले, विजयालक्ष्मी भालेराव, नितीन कंटेकुरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १३ ऑगस्ट २०२५

# दत्तक घेतलेल्या विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील सामाजिक बांधिलकीची भावना जोपासणारे डॉ. शिवाजी सिद्राम शिंदे यांनी गरजु दत्तक घेतलेल्या तीन विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप सोमवारी (ता. ११) रोजी शिंदे गल्ली येथे करण्यात आले. यावेळी डॉ. शिवाजी शिंदे, रुपाली शिंदे, धम्मचारी धम्मभूषण, मनोहर शिंदे, धनराज शिंदे यांच्या हस्ते प्रतीक्षा प्रभाकर कांबळे, आयशा अल्लाउद्दीन ढोबळे, रोशनी राजू कांबळे या गरजू विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. आपण समाजाचं देणं लागतो या हेतूने काम करणाऱ्या अनेक व्यक्ती आपल्या आसपास आहेत. मुरूमचे सुपुत्र हरियाणा राज्यातील पानिपत या ठिकाणी क्षेत्रीय प्रबंधक या पदावर कार्यरत असलेले डॉ. शिवाजी शिंदे, त्यांच्या पत्नी रुपाली शिंदे या दोघांच्या विचारांमुळे त्यांनी शैक्षणिक पालकत्व अभियानांतर्गत परिस्थितीमुळे शिक्षणापासून दूर गेलेल्या विद्यार्थिनींना स्वत:च्या पायावर उभे राहण्याची संधी मिळवून दिली आहे. ज्या विद्यार्थिनींना पुढील शिक्षण घेण्याची इच्छा आहे. शिकून काहीतरी मोठे बनण्याची जिद्द आहे परंतु घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण घेणे अडचणीचे आहे. अशा विद्यार्थिनींना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी मदत करण्याचे डॉ. शिवाजी शिंदे यांनी योजिले. या उपक्रमामुळे मुलींचे शिक्षण मध्येच बंद होणार नाही व त्या स्वत:च्या पायावर उभे राहून स्वावलंबी बनतील, असा विश्वास डॉ. शिंदे, रुपाली शिंदे यांनी उपस्थित दत्तक मुलींशी आणि उपस्थिता संवाद साधताना व्यक्त केला. शिक्षणामुळे या मुली पुढे जाऊन आदर्श महिला, गृहिणी, माता बनून एक आदर्श कुटुंब व आदर्श समाज घडवतील, असे ते म्हणाले. डॉ. शिवाजी शिंदे व रुपाली शिंदे कै. सिद्राम गंगाराम शिंदे (गुरुजी) यांच्या स्मरणार्थ दरवर्षी १० वी व १२ वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करतात. धम्मचारी धम्मभूषण मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, दानशील मनुष्य रणांगणावर जायला निघालेल्या एखाद्या उत्साही योद्ध्यासारखा असतो. प्रेमळ दयाशील दाता आदराने दान देतो आणि आपल्या अंत:करणातील द्वेष, मत्सर, क्रोधादी सर्व विकारांना हद्दपार करतो. दानशील पुरुषाला मुक्तीचा मार्ग गवसलेला असतो. कार्यक्रमाकरिता ऐश्वर्या शिंदे, सचिन शिंदे, ज्योतीराम शिंदे, वसंत शिंदे, धनराज शिंदे, वैभव कटके आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनराज शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन तात्यासाहेब शिंदे तर आभार मनोहर शिंदे यांनी मानले. याप्रसंगी विद्यार्थ्यांचे पालक, माता उपस्थित होत्या.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# केसापुरी येथे भगवान हनुमान मूर्तीचे प्राणप्रतिष्ठा मोठ्या उत्साहात संपन्न





**दौलताबाद (जावेद अहमद) :** किल्ला च्या पाठीमागे असलेल्या केसापुरी गावात आज भगवान हनुमान मूर्तीचे प्राणप्रतिष्ठा साजरी करण्यात आलीहनुमान मूर्तीचे व कलश ची गावभर मिरवणूक काढण्यात आलीमोठ्या उत्साहाने सर्वांनी मिळून भाग घेत फुगड्या खेळत जय बजरंग बली,जय वीर हनुमान गुणगान गुण सागर भक्ती भावेत सहभागी होत मिरवणूक काढण्यात आलीगुरु वर्ग यांच्या हस्ते विधिवत पूजा अर्चना करून मूर्तीची स्थापना करण्यात आलीभजन कीर्तन च्या गजरात भव्य मूर्ती स्थापना करण्यात आली व महाप्रसाद वाटप करण्यात आलेयावेळी मा सरपंच ज्ञानेश्वर पवार,धोंडीराम निकम,वाल्मिक सुराशे,भाऊसाहेब कलसकर, सुनील निकम ,गणेश सुराशे ,माधव पवार ,साहेबराव मोरे,रामनाथ गुंजाळ ,चेतन जाधव ,रामनाथ औटे ,ज्ञानेश्वर कलसकर ,सोमनाथ कलसकर, सोपन कलसकर, साहेबराव निकम,डॉक्टर कैलास निकम ,शिवाजी गुंजाळ ,औमकार गुंजाळ, काकासाहेब गुंजाळ, गणेश निकम व महिला यांची प्रमुख उपस्थिती होती

# यशस्वी जीवनासाठी युवकांनी व्यवहार ज्ञान कौशल्य आत्मसात करा - डॉ. दिपक पोफळे




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** विचाराचे बीजारोपण करून, नाविन्याची कास धरून, माहितीचे ज्ञानामध्ये रूपांतर करून त्याला कौशल्याची जोड द्या. बुद्धिमान व्हा, तर यशाची शिखरे पार कराल. यासाठी युवकांनी व्यवहार ज्ञान कौशल्य आत्मसात करावी. असे आव्हान रोटरीचे माजी प्रांतपाल डॉक्टर दीपक पोकळे यांनी केले युवकांना केले.येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दिनांक 12 ऑगस्ट 2025 रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून ची 'देशाच्या शाश्वत भविष्यासाठी युवा सक्षमीकरण' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले उपजिल्हा रुग्णालय उमरगा येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ कोमल गरड महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ विलास इंगळे उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले, प्रभारी प्राध्यापक डॉ. ए एस पदमपल्ले डॉ. एस. पी. इंगळे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ भरत शेळके डॉ. अनिल देशमुख डॉ रंजना चिचोंडे एनसीसी विभागाचे कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिटमपल्ले प्रा मुरलीधर जाधव प्रा पी आर चव्हाण प्रा ज्योती जोगदाबगे अभय भालेराव समुपदेशक, आणि प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. युवकांच्या आरोग्य सक्षमीकरणावर भर देऊन समाजात आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करण्यासाठी महाविद्यालयात 'रेड रिबीन क्लब' स्थापन करण्यात आला. त्याच्या नाम फलकाचे उद्घाटन डॉ कोमल गरड यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांना काळाची गरज ओळखून आपले ध्येय क्षेत्र निवडण्यासंबंधी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे विद्यार्थी निकिता टेकले, प्रज्वल चव्हाण यांनी केले तर प्रतिक्षा यादव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १३ ऑगस्ट २०२५


## विद्यार्थ्यांची उपस्थिती हा चिंतेचा विषय - प्राचार्य डॉ. गुलाब राठोड




**उमरगा (नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे अँटी रॅगिंग दिवसाच्या निमित्ताने श्रीकृष्ण महाविद्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरून ते बोलत होते. अँटी रॅगिंग हा दिवस भारत सरकारने १९९७ मध्ये मंजूर केलेल्या रॅगिंग विरोधी कायद्याच्या स्मरणार्थ साजरा केला जातो,ज्याचा उद्देश रॅगिंगची प्रथा नष्ट करणे हा आहे.ज्यामध्ये विद्यार्थ्यांची,विद्यार्थिनींची छळवणूक किंवा छळ याचा मुख्य समावेश आहे.परंतु अँटी रॅगिंग कायदा का व कशासाठी अस्तित्वात आला याचा ऊहापोह करताना डॉ.गुलाब राठोड म्हणाले की,खरे तर ज्या विद्यार्थ्यांसाठी हा कायदा अस्तित्वात आला ते विद्यार्थीच आज सर्वच महाविद्यालयात अत्यंत नगण्य स्वरूपात उपस्थित आहेत.शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या आपल्या सर्वांसाठीच शैक्षणिक क्षेत्रातील उदासीन बाब आहे,असे सांगून चिंता व्यक्त केली.आपल्या सर्वांच्या सकारात्मक प्रयत्नाने ही आलेली मरगळ आपल्याला झटकून टाकता येते असेही ते सांगायला विसरले नाहीत.श्रीकृष्ण महाविद्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ.एम.सी.खोत व डॉ.बी.जे उगले हे उपस्थित होते.प्रमुख पाहुणे डॉ.एम.सी. खोत यांनी रॅगिंग म्हणजे काय हे सांगून भारतात त्याची तीव्रता कशी वाढली हे सप्रमाण सांगितले,याविषयी अधिक माहिती घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ अनुदान मंडळाच्या वेबसाईटची मदत घेण्याचे आवाहनही त्यांनी केले..कोणत्याही विद्यार्थ्याचा कसल्याही प्रकारचा छळ होऊ नये याची आवश्यकता प्रतिपादन करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास हा मुक्त वातावरणात झाला पाहिजे ही अपेक्षा व्यक्त केली.याप्रसंगी डॉ.बी.जे.उगले यांनीही आपले समुचित विचार मांडले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्हि.एस होगाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.पाथरे यांनी केले त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमाला विद्यार्थी,प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पुण्यात १७ वर्षीय मुलीची आत्महत्या



**पुणे :** एका 17 वर्षीय मुलीकडे मागील दाेन महिन्यापासून शरीर सुखाची मागणी एका तरुणाने केली. परंतु मुलीने त्यास नकार दिल्याने त्याकारणाने ओळखी मधील तरुणाने तिला मारहाण करुन मानसिक त्रास दिल्याने संबंधित मुलीस आत्महत्या करण्यास भाग पाडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी पिडित मुलीच्या 41 वर्षीय आईने आराेपी विरोधात येरवडा पोलीसांकडे तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार आयुष शिंदे (वय- 25,रा. चिखलवाडी, खडकी,पुणे) या आराेपीवर भान्यास कलम 108, 75 (2), 115 (2) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित पिडित मुलगी व आराेपी हे एकमेकांचे ओळखीचे आहे. परंतु आरोपी आयुष शिंदे हा मुलीस मागील दोन महिन्यापासून सातत्याने शरीरसुखाची मागणी करत होता. परंतु त्या गोष्टीकरिता मुलीने त्यास नकार दिला होता. या गोष्टीचा राग आल्याने तरुणाने तिला मारहाण देखील केली. या प्रकारामुळे भयभीत झालेल्या मुलीस मानसिक त्रास होऊन तिला आत्महत्या करण्यास भाग पाडल्याने आरोपी विरोधात पोलीसांनी गुन्हा दाकल केला आहे. याप्रकरणी पुढील तपास सहाय्यक पाेलीस निरीक्षक एस लामखडे करत आहे.

अश्लील वर्तवणूक प्रकरणी विनयभंगाचा गुन्हा दाखल तरुणीला वारंवार केबिनमध्ये बोलवून व कंपनीच्या कार्यक्रमामध्ये बोलवून वाईट नजरेने मिठी मारून, अश्लील हावभाव करून, डोळ्याने खुना करून तिला वारंवार मिठी मारून अश्लिल चाळे केल्याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतिक प्रकाशचंद्र सुराणा (50, रा. इसडोरा अपार्टमेंट, पुष्पक पार्क, मुसळेरोड, औंध, पुणे) याच्यावर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका 34 वर्षीय तरूणीने पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## धारदार तलवार बाळगणाऱ्या इसमांची दौलताबाद पोलिसांनी आवळल्या मुसक्या



**दौलताबाद (जावेद अहमद) :** पोलीस स्टेशन अंतर्गत अब्दिमंडी गावातील एका तरुणाजवळ पिस्टल बाळगून असल्याची माहिती दौलताबाद पोलिसांना मिळाली पोलिसांनी त्या इसमाच्या घराची झडती घेतली असता एक धारदार तलवार मिळून आली यावरून शेख अफराण शेख चांद, वय 25,राहणार अब्दिमंडी, ताजी छत्रपती संभाजीनगर याच्याविरुद्ध दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पोलीस निरीक्षक रेखा लोंढे यांना गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की अब्दिमंडी गावातील एक तरुण आपल्या घरात पिस्टल बाळगून आहेत. या मातीवरून पोलीस निरीक्षक रेखा लोंढे, उपनिरीक्षक सुनील बोडके, पोलीस आमदार महेश घुगे यांनी शेख अफरान यांच्या अब्दीमंडी येथील घराची झडती घेतली असता घरात एक धारदार तलवार मिळून आली यावरून दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये पोलीस अंमलदार महेश घुगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शेख अफरान याच्या विरुद्ध हत्यार कायदा 4,25 प्रमाणे दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अमलदार राजेंद्र सोनवणे हे करीत आहेत.


